## प्रतिज्ञापत्र

सदरचा दस्त हा नोंदणी कायदा १९०८ अंतर्गत असलेल्या नियमातील तरतुदीनुसारच नोंदण्यास दाखल केलेला आहे. दस्तातील संपुर्ण मजकूर निष्पादक व्यक्ती साक्षीदार, ओळखदार व दस्तासोबत जोडलेल्या कागदपत्रांची सत्यता दोन्ही पक्षकारांनी तपासली आहे. दस्ताची सत्यता / वैधता कायदेशीर बांबीसाठी दस्त निष्पादक पक्षकार व कबुलीधारक हे जबाबदार राहतील. दस्तऐवजासोबत जोडलेली कागदपत्रे, कुलमुखत्यार धारक व्यक्ती, ओळखदार, साक्षीदार इत्यादी बनावट आढळून आल्यास याची संपुर्ण जबाबदारी निष्पादकांची राहील.

महाराष्ट्र नोंदणी नियम १९६१ मधील नियम ४४ नुसार सदरच्या दस्तऐवजाची वैधता तपासण्याची जबाबदारी नोंदणी अधिका-यांची नाही. मालमत्ता हस्तांतरण कायदा १९८२ चे कलम ५५ नुसार दस्तातील नमुद मिळकतीचे title (हक्क) तपासावयाची जबाबदारी लिहून देणार / लिहून घेणार पक्षकार यांची आहे. याची जाणीव दस्तातील दोन्ही पक्षकार यांना आहे.

दस्तात नमुद केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही कार्यालयात अथवा न्यायालयात दावा / खटला / वाद दाखल नाही. तसेच दस्तात नमुद मिळकतीबाबत कोणत्याही न्यायालयातून स्टे ऑर्डर किंवा मनाई हुकुम मिळालेला नाही. याबाबतची समज दस्तातील लिहून देणार व लिहून घेणार यांना आहे. सदर मजकुर आम्ही वाचला असून तो आम्हास मान्य व कबुल आहे. हे प्रतिज्ञापत्र

लिहून घेणार                                        लिहून देणार

विभाग क्र. -
मुल्यांकन रूपये -
खरेदी किंमत रूपये -
मुद्रांक रूपये -
नोंदणी फी -

# फ्लॅट विक्री करारनामा

फ्लॅट विक्री करारनामा आज दिनांक ......माहे ----------- इसवी सन २०17 रोज वार ----------------  ते दिवशी नाशिक मुक्कामी ...

श्री/ सौ. -----------------------------
वय -            धंदा -
पॅन नं. -                                                        लिहून घेणार
रा. ----------------------------------------
--------------------------------------------

यांसी
**१)सौ.मेघा दिंगबर बर्वे**
**वय-५१, धंदा- घरकाम**
**रा. कोकणगांव ता.निफाड जि.नाशिक**
**२) श्रीमती मिराबाई निवृत्ती गवारी**
**वय- ५८, धंदा - घरकाम**
**रा. पिंपळगांव बसवंत ता.निफाड जि.नाशिक**                **लिहून देणार**
**अ.नं. १ व २ यांचे तर्फे विकसनकर्ता व**
**जनरल मुखत्यार धारक म्हणून**
**श्री. गोंविद भाऊसाहेब मढवई**
वय - २९ धंदा - व्यवसाय
पॅन नं. - AXOPM9878M
रा. पिंपळगांव लेप, ता.येवला जि.नाशिक

कारणे फ्लॅट विक्री करारनामा लिहून देतो की,

१. मिळकतीचे वर्णन- अ) तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका नाशिक पैकी नाशिक महानगर पालिका हद्दीतील मौजे आडगांव या गावचे शिवारातील बिनशेती मिळकत यांसी गट नं. ५०९/३/३ यांसी प्लॉट नं. ३+४ यांसी एकुण क्षेत्र ४३२.०० चौ.मी. यांसी एकत्रित चतुःसिमा खालील प्रमाणे.

पुर्वेस - कालॅनी रोड

पश्चिमेस - सर्व्हे नं. १३८

दक्षिणेस - प्लॉट नं. ५

उत्तरेस - प्लॉट नं. २

यणे प्रमाणे चतुःसिमेतील प्लॉट मिळकत जल, तरू, काष्ट, पाषाण, निधी, निक्षेपासह व तदंगभूत वस्तुंसह तसेच सदरहू मिळकतीत जाण्यायेण्याचे

व वागवहिवाटीचे पुर्णपणे हक्कांसह तसेच ले आऊट मधील कॉलनी रोड व ओपन स्पेस सामाईक वापराचे हक्कासह मिळकत दारोबस्त.

ब) खरेदी देय मिळकतीचे वर्णन - वर कलम १ अ यात वर्णन केलेल्या प्लॉट मिलकतींवर नाशिक महानगरपालिकेकडे मंजूर झालेल्या बांधकाम प्लॅन प्रमाणे तयार झालेल्या **साई गोविंद अपार्टमेंट** या इमारतीमधील ........ मजल्यावरील मधील फ्लॅट नं. ......... यांसी क्षेत्र ....... चौ.मी. कारपेट , मिळकत यांसी चतुःसिमा मंजुर बिल्डींग प्लॅन नुसार खालील प्रमाणे -

पुर्वेस -

पश्चिमेस -

दक्षिणेस -

उत्तरेस -

यणेप्रमाणे चतुःसिमेतील फ्लॅट मिळकत, सदर मिळकतीत जीना, टेरेस व जाण्या येण्याचे सामाईक हक्कासह तसेच मोकळी जागा, पार्किंग व इतर सुखसुविधा वापरण्याचे हक्कासह मिळकत दरोबस्त.

२) उपरोक्त कलम १ अ यात वर्णन केलेली मिळकतीपैकी प्लॉट नं. ३ ही मिळकत श्रीमती मिराबाई निवृत्ती गवारी यांच्या खरेदी मालकीची आहे तसेच प्लॉट नं. ४ ही मिळकत सौ.मेघा दिगंबर बर्वे यांच्या खरेदी मालकीची आहे. सदर खरेदीखतांच्या आधारे त्यांची नावे उपरोक्त मिळकतीच्या ७/१२ उता-यास नोंद नं. १२८२ अन्वये दाखल झालेली आहेत. सदर मिळकतींचे खरेदीदार मालक म्हणून त्यांना सदर मिळकतींचा पाहिजे तसा उपभोग घेण्याचा अगर तीची विक्री अगर विल्हेवाट लावण्याचा संपुर्ण हक्क व अधिकार आहे. सदरच्या प्लॉट मिळकतींचा त्यांना बिनशेती वापर करणे शक्य नसल्यामुळे त्यांनी सदरची मिळकती स्वतः बिनशेती कारणासाठी विकसीत न करता डेव्हलपर्स श्री. गोविंद भाऊसाहेब मढवई यांना विकसनासाठी देण्याचे

निश्चित केले त्या अनुषंगाने त्यांनी श्री. गोविंद भाऊसाहेब मढवई यांचे लाभात दिनांक २४/१०/२०१३ रोजी वेगवेगळ्या दस्तान्वये विकसन करारनामा व जनरल मुखत्यारपत्र लिहून देऊन सदरचे दस्त त्याच दिवशी नाशिक येथील मे.सब रजिष्ट्रार यांचे कार्यालयात अनु.नं. ११९८१, ११९८२, १९९८४, ११९८५ अन्वये नोंदवुन दिलेले आहे. सदर दस्तांचा अमंल आजही कायम आहे. तसेच सदरील मिळकती संदर्भात लिहून देणार यांनी आपआपसात पुरवणी करारनामा लिहून व नोंदवुन ठेवलेला आहे. सदर मिळकतीचा श्री. गोविंद भाऊसाहेब मढवई यांना विकसनकर्ते या नात्याने सदर मिळकती विकसीत करण्याचा हक्क व अधिकार प्राप्त झाला. त्या प्राप्त हक्क व अधिकारात श्री.गोविंद भाऊसाहेब मढवई यांना सदर मिळकतीचा पाहिजे तसा उपभोग घेण्याचा अगर पाहिजे तसा विक्री अगर विल्हेवाट लावण्याचा संपुर्ण हक्क व अधिकार होता व आहे.

३) वर नमुद १ अ यात वर्णन केलेली मिळकत बिनशेती वापराची मिळकत आहे तत्संबधीचा आदेश पुर्वाश्रमीचे मालकांनी मे. जिल्हाधिकारी साो. नाशिक यांचे कडील पत्र क्र. आरबीडी / T T T / एलएनए /एसआर २८७ /१९८५ दि. २४/१२/१९८५ अन्वये मंजुरी मिळालेली आहे. तसेच सदर प्लॉट मिळकत ही मंजुर ले-आऊट मधील असून तत्संबधीचे जावक नंबर / एलएनडी / जा.नं. अंतिम ले आऊट /४४ /२७१ दि. २९/०४/१९८६ अन्वये मंजुरी मिळालेली आहे.

४) लिहून देणार यांनी त्यांना विकसन कर्ते व जनरल मुखत्यार धारक या नात्याने प्राप्त असलेल्या हक्क व अधिकारात तसेच लिहून देणार यांचा प्लॉट मिळकती बांधकामासाठी विकसीत करून विकसीत केलेले बांधीव क्षेत्र विक्री करण्याचा व्यवसाय आहे. त्या अनुषंगाने लिहून देणार यांनी परिशिष्ठ १ यात वर्णन केलेली मिळकत बांधकामासाठी विकसीत

करण्याचे निश्चीत केले. त्यानुसार सदर प्लॉट मिळकतीवर बांधकाम नकाशा मंजुर करून घेवुन त्यासाठी नाशिक महानगरपालिका नाशिक यांचेकडून कमेंन्समेंट **सर्टीफिकेट नं. एलएनडी / बीपी / पंच / सी- ५ / ४५९ / २३९० दिनांक १०/१०/२०१४** अन्वये घेवुन त्यानुसार इमारतीचे बांधकाम ''**साई गोविंद** '' या नावाने पुर्ण केलेले असून त्या संबंधीचा बांधकाम पुर्णत्वाचा दाखला मिळणेकामी नाशिक महानगरपालिका यांचेकडे योग्य ती कारवाई सुरू केलेली आहे. सदर इमारतीचा बांधकाम पुर्णत्वाचा दाखला घेण्याचे लिहून देणार यांनी अंगीकारलेले आहे.

५) सबब वर नमुद बांधकाम नकाशा नुसार बांधकाम करून त्यानुसार बांधण्यात येणारे सर्व बांधीव भाग विक्री करण्याचे हक्क व अधिकार लिहून देणार यांना वर नमुद विकसन कर्ते व जनरल मुखत्यार धारक या नात्याने प्राप्त आहे.

६) वर कलम १ अ यात वर्णन केलेल्या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या प्रकल्पाची / इमारतीची लिहून देणार यांनी रिअल इस्टेट रेग्युलेशन ॲण्ड डेव्हलपमेंट ॲक्ट २०१६ (RERA) च्या तरतुदीनुसार दि. . . . . . . रोजी नोदंणी केलेला असून रजिष्ट्रेशन नंबर . . . . . .. .. असा आहे.

७) सदर रिअल इस्टेट रेग्युलेशन ॲण्ड डेव्हलपमेंट ॲक्ट २०१६ चे कलम १३ नुसार लिहून देणार यांनी लिहून घेणार यांचे लाभात सदरचा करारनामा लिहून दिलेला आहे व रजिस्ट्रेशन ॲक्ट १९०८ चे अधिन राहून मे.दुय्यम निबंधक साहेब नाशिक यांचे कार्यालयांत सदरचा करारनामा लिहून देणार हे लिहून घेणार यांचे लाभात लिहून व नोंदवून देत आहेत.

८) वर कलम १ ब मध्ये वर्णन केलेली मिळकत ही लिहून घेणार यांनी खरेदी घेण्याची इच्छा प्रकट केली. सदर प्रमाणे उभयपक्षांमध्ये मिळकत खरेदीबाबत बोलणी होऊन लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना

उपराक्त कलम १ ब  मध्ये नुमद केली मिळकत खरेदी देण्याचे मान्य केलेले आहे. त्यानुसार सदरचा करारनामा आजरोजी लिहून देणार यांनी लिहून घेणार यांचे लाभात  लिहून दिला आहे.

९) वर कलम १ ब मध्ये वर्णन केलेली मिळकतीची उभयतांचे दरम्यान बोलणी होऊन सदरच्या मिळकतीची एकुण किमंत रक्कम रूपये ---------------/- ( अक्षरी रक्कम रूपये ------------------------ मात्र) अशी ठरली असून सदरच्या किमंत ही आजचे बाजारभावाप्रमाणे योग्य व बरोबर असून किंमतीबाबत लिहून घेणार व लिहून देणार यांचेमध्ये काहीएक तक्रार नाही.

१०) उपरोक्त कलम १ ब मध्ये नमुद केलेल्या मिळकतीचा फ्लॅट विक्री करारनामा आणि मुळ करारनामा ओनरशिप फ्लॅट ॲक्ट १९६३ अथवा महाराष्ट्र अपार्टमेंट ओनरशिप फ्लॅट ॲक्ट १९७० अथवा महाराष्ट्र को.ऑप. सोसायटी ॲक्ट १९६० चे तरतुदीस व नियमास अनुसरून केलेला आहे.

११) भरण्याचा तपशिल  :-

| **अ.क्र** | **रक्कम रू** | **भरणा तपशिल** |
|---|---|---|
| **१** | **------------------/-** | (अक्षरी रक्कम रु ------------------- मात्र)लिहून घेणार यांनी त्यांचे खाते असलेली बॅंक …….. बॅंक ----------- या बॅंकेवरील चेक क्रं -----------अन्वये दिनांक --------------- रोजी लिहून देणार यांना अदा केलेले आहेत. |
| **२.** | **-----------------/-** | (अक्षरी रक्कम रु ------------------- मात्र)लिहून घेणार यांनी त्यांचे खाते असलेली बॅंक …….. बॅंक ----------- या बॅंकेवरील चेक क्रं -----------अन्वये दिनांक --------------- रोजी लिहून देणार यांना अदा केलेले आहेत. |

| | | |
|---|---|---|
| **३.** | ------------------/- | अक्षरी रक्कम रूपये ----------------मात्र लिहून घेणार यांनी लिहून देणार यानां १ महिन्यांत कोणत्याही वित्तीय संस्थेकडून अथवा बँकेकडून गृहकर्ज घेवून अदा करावयाचे आहे. |
| **एकुण** | -------------/- | (अक्षरी रक्कम रूपये ------------------ मात्र) |

उपरोक्त भरण्यामधील रक्कम रूपये ---------------/- मात्र कर्ज मंजुर करून बांधकामाचे प्रगतीनुसार अथवा एक रक्कमी लिहून देणार यांना द्यावयाचे आहे.

१२) उपरोक्त कलम १ ब मध्ये वर्णन केलेल्या फ्लॅटच्या किमंतीचा संपुर्ण भरणा लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना अदा केल्यानंतर व तसेच नाशिक महारनगरपालिके कडून बांधकाम पुर्णत्वाचा दाखला लिहून देणार यांनी पदरखर्चाने दिल्यानंतर सदरचे फ्लॅटचे स्वतंत्र डीड ऑफ अपार्टमेंट (खरेदीखत) करून द्यावयाचे आहे. मात्र डीड ऑफ अपार्टमेंट कामी येणा-या खर्चाची रक्कम ही लिहून घेणार यांनी द्यावयाची आहे. तसेच सदर इमारतीचे घोषणापत्र लिहून देणार हे पदरखर्चाने लिहून व नोंदवुन देतील.

१३) सदर इमारतीचे बांधकाम सुरू असतांना बांधकाम पूर्णत्वाचा दाखला घेण्यापूर्वी रिअल इस्टेट रेग्युलेशन डेंव्हलपमेंट ॲक्ट,२०१६ चे कलम ४ ४ नुसार इमारत नकाशामध्ये ४ ते ५ टक्के पावेतो बदल करावयाचे अधिकार लिहून देणार यांना राहतील त्याबाबत लिहून घेणार हे कोणतेही तक्रार उपस्थित करणार नाही. इमारत नकाशामध्ये बदल करत असतांना वर कलम १-ब यांत वर्णन केलेल्या मिळकतीचे क्षेत्रपेक्षा कम कमी क्षेत्र भरत असल्यास लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना कमी पडलेल्या क्षेत्राचा मोबदला परत करावयाचा आहे. तसेच यदाकदाचित सदरील क्षेत्र जास्त भरत असल्यास लिहून घेणार यांनी जास्त क्षेत्राचा वाढीव मोबदला लिहून देणार यांना अदा करावयाचा आहे.

१४) यदाकदाचित वर कलम १-ब यांत वर्णन केलेल्या मिळकतीबाबत अथवा सदरील करारनाम्यासंदर्भात भविष्यात उभयतांत कोणत्याही स्वरुपाचा वाद अथवा तक्रार उपस्थित झाल्यास सदरील वादाचे अथवा तक्रारीचे निराकरण लिहून घेणार व लिहून देणार यांनी दोघांनी मिळून लवादाची नेमणूक करुन लवादामार्फत करावयाचे आहे. सदरील लवादाचा निर्णय हा अंतिम निर्णय असेल ही या कराराची महत्तवाची शर्त आहे.

१५) उपरोक्त कलम १-ब मध्ये वर्णन केलेली प्लॅट मिळकत ह लिहून घेणार यांना निवासी कारणासाठी दिला असून त्या कारणाव्यतिरिक्त लिहून घेणार यांनी त्याचा वापर करावयाचा नाही.तसेच सदर इमारतीचे मोकळया जागेतून ड्रेनेजची लाइन ही संपूर्ण इमारतीसाठी एकाच असल्याने संपूर्ण निवासी धारकांनी सदर ड्रेनेजची सदनिका धारकांच्या दूष्टीने आवश्यक बाब आहे त्यासाठी सर्व रहिवाशी सदनिका धारकांनी सदर गोष्टींचा मेंटेनन्स ठेवण्यासाठी एकत्रितरित्या सहकार्य करावयाचे आहे.तसेच सदर ड्रेनेजची लाइन व सेप्टी टँक बाबत दुरूस्ती अथवा तक्रार असल्यास स्वतंत्र दुरुस्ती ही महानगरपालिका व लिहून देणार यांचे परवानगीशिवाय करावयाची नाही ही अट सर्व रहिवाशी सदनिका धारकांना लागू राहील.

१६) वर कलम १ अ व १-ब मध्ये नमूद केलेली मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची आहे.सदर मिळकत ही कुठेही गहाण, दान, लिन, लिज, तारण, देणगी, अन्नवस्त्र, बक्षीपत्र, मृत्युपत्र, जप्ती जामीनकी, कुळवारस, मनाई हुकूम, लेखी अगर तोंडी करारमदार, अगर अन्य प्रकारच्या कोणत्याही जडजोखमीत गुंतवलेली नाही. तसेच सादर मिळकतीच्या मालकी हक्काबाबत व कब्जाबाबत, चतु:सीमेबाबत, हद्दीबाबात, कोणत्याही कोर्टोत वाद न्यायप्रविष्ट नाही.तसेच सदर मिळकत ही कुठल्याही सरकारी अगर निमसरकारी खात्याकडे ॲक्वीझिशन अगर रिक्वीझिशन झालेली नसून आजपावेतो तशी नोटीस देखील लिहून देणार यांना मिळालेली नाही.

तसेच सदर प्लॉट मिळकतीवरुन कुठल्याही प्रकारच्या रोड विस्ताराची रेषा जात नाही. अगर सार्वजनिक कामासाठी राखीव म्हणून घोषित झालेली नाही.

१७) लिहून घेणार यांचे लाभात फ्लॅट हस्तांतर करण्यासाठी हा करारनामा दस्त नोंदणीकृत करीत असून त्यासाठी लागणारा खर्च जसे मुद्रांक शुल्क, नोंदणी फी, वकील फी, लिहिणावळ, नोंदणीवळ, इत्यादी संपूर्ण खर्च हा लिहून घेणार यांनी करावयाचा आहे तो खर्च त्यांचेवर बंधनकारक राहील.

१८) लिहून घेणार यांना जी सदनिका नोंदणीकृत करारनाम्यानुसार दिलेली आहे. त्यांचे बांधकाम व सुखसुविधा हया परिशिष्ट - अ मध्ये नमूद केलेल्या आहेत. त्या लिहून घेणार यांनी सक्षम जागेवर जाऊन खात्री करुन घेतलेल्या आहेत. त्याबाबत त्यांची कुठल्याही प्रकारची हरकत अगर तक्रार नाही असे लिहून घेणार यांनी मान्य व कबुल केलेले आहे.

१९) उपरोक्त नमूद मिळकतीचा कब्जा हा इमारतीच बांधकाम पूर्ण झालेनंतर लिहून देणार यांनी नाशिक महानगर पालिका यांचेकडून बांधकाम पूर्णत्वाचा दाखला घेवून इमारतीचे स्वतंत्र घोषणापत्र लिहून व नोंदवून दिल्यानंतर लिहून घेणार यांनी उर्वरित भरणा अदा करुन लिहून देणार यांचेकडून मिळकतीचे स्वतंत्र डिड ऑफ अपार्टमेट लिहून व नोंदवून घ्यावयाच्या वेळेस लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना द्यावयाचा आहे. सदर प्लॅटचा ताबा मिळालेनंतर लिहून घेणार यांनी यापुढे होणारे इमारतीचे व खर्चाने सरकारी कर,महानगरपालिकेचे पाणी बिल, एम.एस.ई.बी.लाईट बील व अपार्टमेंट मेंटेनन्स इत्यादि खर्च करावयाचा आहे.सदरच्या खर्चांबाबत लिहून देणार जबाबदार राहणार नाहीत.

२०) उपरोक्त कलम १-ब मध्ये नमूद केलेल्या फ्लॅट मिळकतीबाबत लिहून घेणार यांना कोणत्याही वित्तीय संस्थेकडून कर्ज मिळविण्यासाठी आवश्यक ते सर्व कागदपत्र लिहून देणार यांनी पुरविलेले आहे व सदरचे कर्ज हे लिहून

घेणार यांनी मंजूर करावयाचे असून ते संपूर्ण परतफेड करवायची जबाबदारी ही लिहून घेणार यांचेवर राहील. त्या कर्जाच्या परतफेडीसाठी लिहून देणार जबाबदार राहणार नाही.

२१) सदर फ्लॅटसाठी लिहून देणार यांनी स्वतंत्र इलेक्ट्रिक मीटर बसवून दयावयाचे असून ते लिहून घेणार यांचे नावावर करुन दयावयाचे आहे. सदर इलेक्ट्रिक मीटरच्या संदर्भात व महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी संदर्भात वेळोवेळी होणारे बदल हे लिहून घेणार यांचेवर बंधनकारक राहतील. सदर इलेक्ट्रिक मिटरचे प्लॅटचा ताबा मिळालेनंतर येणारे विज वापराचे भाडे हे लिहून घेणार यांनी भरवायचे आहेत.

२२) उपरोक्त नमूद **साई गोविंद** या इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. लिहून देणार हे रितसर बांधकाम पूर्णत्वाचा दाखला घेवून देतील व त्यानंतर लगेचच घोषणापत्र लिहून दिल्यानंतर मिळकतीचे फायनल दस्त करतेवेळी सदर मिळकतीचा कब्जा लिहून घेणार यांना दिला जाईल हे लिहून घेणार यांना मान्य व कबुल आहे. सबब त्यांनतर घरपटटी, पाणीपटटी, लाईट बील व इतर तत्सम कर हे लिहून घेणार यांनी भरावयाचे आहेत त्यात लिहून देणार यांचा कुठल्याही प्रकारचा संबंध राहणार नाही.

२३) उपरोक्त इमारतीचे घोषणापत्र व स्वतंत्ररित्या डीड ऑफ अपार्टमेंट नोंदणीकृत होई पर्यंत उपरोक्त फ्लॅटमध्ये लिहून घेणार यांनी व इतर अपार्टमेंट धारकांनी अंतर्गत व बाहय असे वाढीव बांधकाम नाशिक महानगरपालिका व लिहून देणार यांचे परवानगीशिवाय करावयाचे नाही. तसे केल्यास होणा-या परिणामास लिहून घेणार व अपार्टमेंट धारक हे स्वतःजबाबदार राहतील.

२४) उपरोक्त कलम १-ब मध्ये वर्णन केलेल्या फ्लॅट मिळकतीबाबत फ्लॅट विक्री करारनामा नोंदणीकृत केले नंतर येणारे सर्व प्रकारची सरकारी तसेच निमसरकारी जसे अबकारी, आयकर, सेवाकर, वॅट अथवा इतर तत्सम कर

आल्यास ते सर्व कर हे लिहून घेणार यांनीच भरवायचे आहेत. त्याकरिता लिहून देणार यांचा कुठल्याही प्रकारचा संबंध राहणार नाही.

२५) तसेच वर कलम १-ब मध्ये नमूद केलेल्या फ्लॅट मिळकतीचा वापर लिहून घेणार यांनी व्यवस्थित करावयाचा आहे. सदर मिळकतीत जाणे येणेसाठी सामाईक वापरवायचे रास्ते, पँसेज,पार्किंग यांचा वापर करतांना आजूबाजूचे फ्लॅट धारकांना व इतर सभासदांना कोणत्याही प्रकारे त्रास होणार नाही यांची दक्षता घ्यावयाची आहे.

## परिशिष्ठ

**:: अ ::**

१. फ्लोअरींगच्या प्रत्येक रूमला डायमंड टाईल्स बसविण्यात येतील व बाथरूमला सात फुट उंचीपर्यत डॅडो ग्लेज्ड टाईल्स बसविण्यात येतील.

२. बाथरूम मध्ये गरम व थंड पाणी मिक्स कण्याची व्यवस्था असेल व त्याप्रमाणे कन्सील्ड प्लंबीग फिटींग करण्यात येईल.

३. किचन ओट्यास चांगल्या प्रतीचा कडप्पा बसविण्यात येईल त्यास स्टेनलेस स्टिलचे सिंक बसविण्यात येईल व खिडकी लेव्हलपर्यत ग्लेज स्टाईल डॅडो बसविण्यात येईल.

४. फ्लॅट मध्ये विद्युत पुरवठा कंसील्ड मध्ये करण्यात येईल.

५. इमारतीच्या जिन्यामध्ये तसेच टेरेसवर प्रत्येकी एक सामाईक इले. पॉईंट राहील.

६. फ्लॅटच्या मुख्य दरवाजाची चौकट मलेशिया लाकडाची राहील.

७. खिडक्या ॲल्युमिनीयम स्लायडींगच्या राहतील व ग्रिल बसविण्यात येईल.

८. संपुर्ण इमारतीचे बाहेरील बाजुस एशियन सिमेंट पेंट देण्यात येईल व आतुन लाईम वॉश करण्यात येईल.

**:: ब :: बांधकाम व इतर**

१. इमारतीचे संपुर्ण स्ट्रक्चर आरसीसी मध्ये राहील.

२. इमारतीचे आतील बांधकाम ४.००(चार) इंच विटामध्ये केले जाईल व बाहेरील बांधकाम ६ (सहा) इंची विटामध्ये केले जाईल.

३. आतील बाजुने नेरूने प्लॅस्टर केले जाईल.

४. इमारतीस तिन्ही बाजुने कंपाऊंड वॉल बांधले जाईल व प्रवेशद्वार एम.एस. लोखंडी अँगल मध्ये केले जाईल.

५. टेरेस व संडास बाथरूमला चांगल्या प्रकारे वॉटर प्रुपींग करण्यात येईल.

येणेप्रमाणे फ्लॅट विक्रीच्या करारनाम्याचा दस्त आज रोजी राजीखुशीने स्वसंतोषने, समजुन उमजुन, कोणत्याही धाक दडपणास बळी न पडता दोन साक्षीदारांसमक्ष सही करून व मान्य व कबुल करून लिहून दिला व घेतला आहे.

हमीपत्र

आम्ही आजरोजी करारनामा / खरेदीखत / अपार्टमेंट डीड / ट्रान्सफर डीड या शिर्षकाचा दस्त नोंदणीसाठी दाखल केलेला आहे. सदर दस्तातील परिशिष्ट १ मधील मिळतीवर बांधण्यात आलेल्या इमारतीमधील परिशिष्ट २ मधील मिळकती सोबत वाहनतळ (पार्कींग) चे क्षेत्र विकत घेतलेले नाही / विकत दिलेले नाही / याबाबतचे हमीपत्र लिहून देत आहे.

हा फ्लॅट विक्री करारनामा.

**१)सौ.मेघा दिंगबर बर्वे**
**२) श्रीमती मिराबाई निवृत्ती गवारी** ---------------------------------
**अ.नं. १ व २ यांचे तर्फे विकसनकर्ता व**
**जनरल मुखत्यार धारक म्हणून**
**श्री. गोंविद भाऊसाहेब मढवई**
**लिहून देणार**

**१.-------------------------**                    -------------------------------

लिहून घेणार

साक्षीदार :

१. ----------------------------------------

२. ---------------------------------------